# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशी-४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोट कलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ

## महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभाग

एम.आय.डी.सी. रोड कॉम्प्लेस, गडचिरोली -४४२६०५
Email : devlopment.section@unigug.ac.in

जा.क्र./गों.वि.ग/म.वि.वि.वि./797 /२०२३

दिनांक : 13/०६/२०२३
अति तातडीचे/कालमर्यादित

## परिपत्रक

**विषय :- अशासकीय महाविद्यालयांच्या नॅक मूल्यांकन/पुनर्मूल्यांकन व मानांकनाबाबत.**

**संदर्भ :- उच्च शिक्षण संचालनालयाचे पत्र क्र. एनजीसी/ २०२३ नॅक/अशा.अनु.म.वि./औवि/मवि-३/६४६२, दि. २३ मे, २०२३.**

विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे मा.संस्था अध्यक्ष/सचिव/प्राचार्य यांना कळविण्यात येते की, ज्या महाविद्यालयांचे अद्यापपावेतो एकदाही नॅक मूल्यांकन व मानांकन न झालेल्या अशासकीय अनुदानित महाविद्यालये व सद्यस्थितीत नॅक मूल्यांकन व पुनर्मुल्यांकन INACTIVE असलेल्या अशासकीय अनुदानित विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित महाविद्यालयांनी शैक्षणिक वर्ष २०२३-२४ च्या प्रथम वर्ष प्रवेशाच्या प्रारंभ दिनांकापर्यंत IIQA (Istitutioanal information for Quality Assessment) नॅक कार्यालयास सादर करणे अनिवार्य आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६, कलम १०९ मधील पोटकलम ६(ख) नुसार महाविद्यालयांचे नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकनाची राज्य शासनाने निर्धारित केलेल्या शर्तींचे ते अनुपालन करीत नसतील तर, राज्य शासनाकडे पाठविणार नाही. अशाप्रकारे तरतूद करण्यात आलेली आहे.

तसेच महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६, कलम ११० मधील पोटकलम ४ नुसार 'महाविद्यालय किंवा परिसंस्था अधिस्वीकृती किंवा, यथास्थिती, पुनर्रअधिस्वीकृतीच्या आवश्यकतांची पूर्तता करण्यात कसूर करील तेव्हा, अशा महाविद्यालयाला किंवा परिसंस्थेला विद्यापीठाकडून कोणतीही संलग्नता देण्यात येणार नाही. अशाप्रकारे तरतूद करण्यात आलेली आहे.

करीता उक्त संदर्भीय पत्राचे अनुषंगाने ज्या संस्था/महाविद्यालयांनी नॅक मुल्यांकन / पुनर्मूल्यांकन करून घेण्याबाबत कार्यवाही केलेली नाही अशा महाविद्यालयांनी तातडीने नॅक मुल्यांकन / पुनर्मूल्यांकनाची कार्यवाही घ्यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दिनांक २६ जून, २०२३ पर्यंत विद्यापीठास सादर करावा. जी महाविद्यालये विहीत मुदतीत अहवाल सादर करणार नाहीत अशा महाविद्यालयांबाबत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील उपरोक्त नमूद सर्व तरतूदीचा अवलंब करून महाविद्यालयांची संलग्नता काढून घेण्याची कार्यवाही विद्यापीठामार्फत करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

**मा. प्र-कुलगुरु महोदयांच्या मान्यतेनुसार,**

13/6/23
(देवेंद्र एम. झाडे)
उपकुलसचिव(प्र.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रति,**

**मा. अध्यक्ष/सचिव/प्राचार्य,**
**सर्व संलग्नित महाविद्यालये**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली**

**प्रतिलिपी :-**

१. **मा. कुलगुरु महोदय, यांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली.**
२. **मा. प्र. कुलगुरु, यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली.**
३. **मा. कुलसचिव, यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली.**

महाराष्ट्र शासन
उच्च शिक्षण संचालनालय,
मध्यवर्ती इमारत, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११००१.
www.dhepune.gov.in फोन नं.०२०/२६१२२११९, Email: mavi.dhepune@nic.in

... विद्यापीठ, गडचिरोली
... कार्यालय
जावक क्र. 4479 दि. 25/5/2...

क्र.एनजीसी/२०२३/नॅक/अशा.अनु.म.वि./औवि/मवि-३/ 6863 दि.२३.०५.२०२३
अत्यंत महत्वाचे/कालमर्यादित.

23 MAY 2023

प्रति,

कुलसचिव,
सर्व अकृषि विद्यापीठे
महाराष्ट्र राज्य.

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभाग
आवक क्र. 1123 दिनांक 25.5.23
जावक क्र. ........ दिनांक ........

विषय -अशासकीय महाविद्यालयांच्या नॅक मूल्यांकन/पुनर्मूल्यांकन व मानांकनाबाबत.

संदर्भ - १.शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण २०१०/(२०/१०)/विशि-३ दि.०८.१०.२०१०.
२.संचालनालयाचे क्र.एनजीसी/२०२२/नॅक/औवि/मवि-३/१०१०० दि.२७.०७.२०२२, १२२०४ दि.०३.१०.२०२२/६७८ दि.२५.०१.२०२३. व ३१७७ दि.२५.०१.२०२३

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, संदर्भ क्र.१ मधील शासन निर्णयानुसार अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांचे मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन अनिवार्य करण्यात आलेले आहे. यामुळे शिक्षणाच्या गुणवत्तेमध्ये अपेक्षित वाढ होऊन उच्च शिक्षणाचा दर्जा वाढण्यास मदत होते.

उच्च शिक्षणाच्या गुणवत्तेचे जतन व संवर्धन व्हावे याकरिता विद्यापीठ अनुदान आयोगाने नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन करणेबाबत निर्देशित केले आहे. या अनुषंगाने संचालनालयाने वेळोवेळी विभागातील शासकीय/अशासकीय महाविद्यालयांचे नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन करुन घेणेबाबत निर्देशित केले आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १०९ मधील पोटकलम ६(ख) मध्ये महाविद्यालयांचे नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकनाची तरतूद नमूद केली आहे. तसेच मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, नागपूर येथील याचिका क्र.५२८०/२०१५ मधील दि.१६.११.२०१६ च्या निकालातही नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकनाचे महत्व अधोरेखित केले आहे.

राज्याची प्रगती होण्यासाठी व जागतिकीकरणाच्या स्पर्धेमध्ये टिकून राहण्यासाठी दर्जेदार उच्च शिक्षण मिळणे आवश्यक आहे. त्यासाठी उच्च व तंत्र शिक्षणाचा दर्जा उंचावणे व त्याची गुणवत्ता वाढविणे आवश्यक आहे. याकरिता महाविद्यालयांचे नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकनाचे महत्व व अनिवार्यता वेळोवेळी अधोरेखित केली आहे. संचालनालयाचे दि.०२ मार्च, २०२३ च्या पत्रान्वये राज्यातील नॅक वैधता संपुष्टात आलेल्या महाविद्यालयांनी **"नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन प्रक्रिया तात्काळ सुरु करुन दि.३१ मार्च, २०२३ पर्यंत नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन प्रारंभ टप्यातील संस्था नोंदणी (HEI Registration) करुन IIQA (Institutional Information for Quality Assessment) नॅक कार्यालयास सादर करणे अनिवार्य आहे. या दिनांकापर्यंत IIQA सादर न केल्यास शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता प्रथम वर्षाच्या प्रवेशास निर्बंध लागू करणेबाबत शासनास प्रस्तावित करण्यात येईल"** असे कळविण्यात आले होते.

उ.कु.सं. (मं.वि.)
24/5/2023

कु. बोरसगोडवार
तातडीने कार्यवाही घ्यावी
25/5/23

तथापि, बहुतांश पात्र महाविद्यालयांनी अद्यापपावेतो नॅक कार्यालयास नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन प्रारंभ टप्प्यातील संस्था नोंदणी (HEI Registration) करुन IIQA (Institutional Information for Quality Assessment) नॅक कार्यालयास सादर केला नसल्याचे नॅकच्या संकेतस्थळावरुन निदर्शनास आले आहे. उपरोक्तप्रमाणे वेळोवेळी निर्देश देवूनही महाविद्यालयांनी नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन करुन घेतलेले नाही ही बाब शैक्षणिकदृष्टया योग्य नाही. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महाविद्यालयाच्या पायाभूत सुविधामध्ये वाढ होणे व शैक्षणिक गुणात्मक दर्जा वाढीसाठी नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन करुन घेणे आवश्यक आहे.

सबब, अद्यापपावेतो एकदाही नॅक मूल्यांकन व मानांकन न झालेल्या अशासकीय अनुदानित महाविद्यालये व सद्यस्थितीत नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन INACTIVE असलेल्या अशासकीय अनुदानित विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित महाविद्यालयांनी शैक्षणिक वर्ष २०२३-२४ च्या प्रथम वर्ष प्रवेशाच्या प्रारंभ दिनांकापर्यंत IIQA (Institutional Information for Quality Assessment) नॅक कार्यालयास सादर करणे अनिवार्य आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १०९ मधील पोटकलम ६(ख) मध्ये महाविद्यालयांचे नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकनाची

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०९ मधिल पोटकलम ०६ (ख) नुसार

(ख) **राज्य शासनाने निर्धारित केलेल्या शर्तींचे ते अनुपालन करीत नसतील तर,राज्य शासनाकडे पाठविणार नाही." अशाप्रकारे तरतूद करण्यात आलेली आहे.**

**तसेच महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ११० मधिल पोटकलम (४) नुसार "महाविद्यालय किंवा परिसंस्था अधिस्वीकृती किंवा, यथास्थिति, पुनर्रअधिस्वीकृती मिळण्यासाठी पात्र आणि अपेक्षित असेल आणि असे महाविद्यालय किंवा परिसंस्था अधिस्वीकृतीच्या किंवा पुनर्रअधिस्वीकृतीच्या आवश्यकतांची पूर्तता करण्यात कसूर करील तेव्हा, अशा महाविद्यालयाला किंवा परिसंस्थेला** विद्यापीठाकडून **कोणतीही संलग्नता देण्यात येणार नाही."** अशाप्रकारे तरतूद करण्यात आलेली आहे.

सबब, वर नमूद करण्यात आलेल्या महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील तरतूदी व शासन निर्णयात नमूद केलेल्या नॅक मूल्यांकन,मानांकन व पुनर्मूल्यांकन करण्यासाठी अटी व शर्तीचे पालन आपल्या विद्यापीठाच्या परिक्षेत्रातील जे महाविद्यालये शैक्षणिक वर्ष २०२३-२४ च्या प्रथम वर्षाच्या प्रवेशाच्या प्रारंभ दिनांकापर्यंत करणार नाहीत अशा महाविद्यालयांबाबत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील उपरोक्त नमूद सर्व तरतूदीचा अवलंब करुन महाविद्यालयांची संलग्नता काढून घेण्याची कारवाई विद्यापीठांनी करणे क्रमप्राप्त आहे. त्यानुसार सर्व विद्यापीठांनी अशा महाविद्यालयांच्या प्रारंभ दिनांकापर्यंत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल महाविद्यालय निहाय संचालनालयास सादर करावा.

**(डॉ.शैलेंद्र देवळाणकर)**
**प्र.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)**
**महाराष्ट्र राज्य, पुणे-१**

**प्रत- माहितीस्तव सादर**

१.मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२
२.स्वीय सहाय्यक, मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२